# ज्ञान सेतू

EDUCATIONAL DIGITAL NEWS PAPER

— शिक्षण, कौशल्य आणि करिअर याचा विश्वासाई दुवा —

संपादक – ब

✻ छत्रपती संभाजीनगर ✻ वर्ष १ ✻ अंक १ ✻ बुधवार दि.१ जुलै २०२६ ✻ पाने - ४ ✻ किंमत - (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

# सोशल मीडिया पासून सावधान

आज फक्त व्हाट्सअप विषयी बघू या. पुढील काही वाक्ये बघू. विशेषत: महिलांनी लक्षात घ्यावे.

डी पी छान आहे, गुड मॉर्निंग, काय चालले आहे, आज काय केले?, फारच सुंदर डिश, मग फुलांच्या इमेज, एकाच ग्रुप वर असेल तर कोणतीही पोस्ट लाईक करणे., किती अप्रतिम लिहिता, फोन वर बोलू या, हे असे हळूहळू वाढत जाते. किंवा कधीकधी एकतर्फी गैरसमज पण करून घेतले जातात. जसे पोस्ट लाईक केली म्हणजे मी आवडले/आवडलो. संभाषण कसे वाढते हे खूप बघितले आहे. त्यातून उगाच दिवा स्वप्ने पाहिली जातात. जे घडलेच नाही पण मनात असते ते सांगितले जाते. किंवा काही कामा निमित्त फोन झाला तरी अमुक व्यक्ती मला सगळे सांगते. असे समज करून घेणे. या सगळ्यात एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे जे कौतुक घरातून मिळत नाही ते मिळू लागले की माणूस त्यात वाहवत जातो.हे सगळे फक्त पुरुष करतात असे नाही. सध्या हे प्रमाण ५०/५०% झाले आहे. अजून एक नवीनच प्रकार समोर येतो, लहान मोठे काहीही न बघता (ते दिसतच नाही म्हणा) एकेरी संबोधन करणे किंवा एकेरी संबोधन करण्यास भाग पाडणे. आणि डिअर / प्रिय म्हणणे. आणि हल्ली सगळेच प्रिय म्हणतात, त्यात विशेष अर्थ नसतो हेही सांगितले जाते. पण माझ्या मागासलेल्या मनाला ते पटत नाही. कारण प्रत्येक शब्दाला काही अर्थ असतो. आणि तो कुठे वापरावा याचे काही सामाजिक संकेत असतात. अर्थात हे माझे मत आणि काहींचे अनुभव आहेत. एकदा प्रिय सुरुवात झाली, की अपेक्षा वाढतात. व्यक्ती


विभावरी कुलकर्णी, पुणे
८०८७८१०१९७


पझेसिव्ह होऊ लागतात. आणि भ्रामक जगात वावरू लागतात.

बरेच जण या आभासी जगाला खरे मानतात. आणि मानसिक संतुलन गमावतात. पण हे सगळे चालू असताना डोळे, कान, बुध्दी सगळे उघडे ठेवावे. साधे विचार या आभासी जगाचे वास्तव दाखवतात.साध्या ओळखीवर फुले, गुड मॉर्निंग येऊ लागले तर हा विचार करावा या व्यक्तीने हे कितीतरी जणींना/जणांना पाठवलेले असू शकते.किंवा असे संभाषण किती व्यक्तींशी चालू असेल. सुरुवातीलाच हा विचार करून बंदी घातली तर पुढचे सगळे टाळता येते.ज्या व्यक्ती फक्त  मध्ये बघतो त्यावर विश्वास कसा ठेवायचा?तो फोटो कोणाचाही असू शकतो.किंवा १० वेळा एडिट करून सुंदर बनवलेला असू शकतो. काही दिवसा पूर्वी एक तक्रार आली होती.शोध थोडा तपास लावला तर वेगळेच सत्य समोर आले. त्या महिलेचे अकाऊंट व फोन तिचा नवरा वापरून पुरुषांना नको ते मेसेज करत होता. आणि पुरुष त्यात वाहवत होते.असे संभाषण करून त्याने अनेक लोकांकडून पैसे घेतले होते. असे बरेच वेगवेगळे किस्से माझ्याकडे आहेत.

म्हणून सर्वांना विनंती आहे, या कडे फक्त एक करमणुकीचे साधन म्हणून बघावे. चांगले असेल ते घ्यावे.आणि कोणत्याही भ्रमात राहू नये. येथील ओळखी लाटांप्रमाणे येतात.आणि ओसरतात. मी ९५० नंबर ब्लॉक केले आहेत. त्या पेक्षा वाचन, व्यायाम, पदार्थ बनवणे, जवळचे मित्र, मैत्रिणी यांच्यात जाणे. कुटुंबात गप्पा मारणे. गाणी ऐकणे, फिरणे, सहलीला जाणे हे करावे. व या आभासी जगा पासून सांभाळून रहावे. माझ्या कडे समुपदेशनासाठी ज्या व्यक्ती येतात त्यांच्या अनुभवातून हे लिखाण केले आहे. क्रमश...

# संस्कारक्षम शिक्षणातूनच घडतात सक्षम नागरिक–डॉ. प्रेरणा उबाळे

**ज्ञान सेतू ब्युरो**

सातारा – लोकमंगल हायस्कूल, नागेवाडी–कुशी येथे उपशिक्षक शशिकांत जाधव यांच्या सेवापूर्तीप्रित्यर्थ भावपूर्ण सत्कार; ३१ वर्षांच्या समर्पित सेवेला मानाचा मुजरा

लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्था, सातारा संचलित लोकमंगल हायस्कूल, नागेवाडी–कुशी (ता. जि. सातारा) येथील ज्येष्ठ उपशिक्षक शशिकांत साहेबराव जाधव यांनी तब्बल ३१ वर्षांच्या प्रदीर्घ, समर्पित आणि विद्यार्थीकेंद्री सेवेनंतर सेवानिवृत्ती स्वीकारल्याबद्दल त्यांचा सेवापूर्ती सत्कार समारंभ शनिवारी (दि. २७) उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला. या वेळी ‘‘हिंदी भाषेमुळे रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होत असून संस्कारक्षम शिक्षणातूनच सक्षम नागरिक घडतात,‘‘ असे प्रतिपादन सहाय्यक प्राध्यापक, अध्यक्ष हिंदी विभाग मॉडर्न कला,  विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पुणे  डॉ. प्रेरणा उबाळे यांनी केले. त्या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या.




समारंभाच्या अध्यक्षस्थानी लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिरीष चिटणीस होते. प्रमुख उपस्थितीत संस्थेच्या सचिव शिल्पा चिटणीस, सातारा जिल्हा परिषदेचे सदस्य सर्जेराव (नाना) सावंत, माजी सैनिक व निवृत्त पोलीस अधिकारी चंद्रकांत जाधव, कोरेगाव पंचायत समितीचे विस्तार अधिकारी प्रशांत जाधव, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, आजी–माजी विद्यार्थी, ग्रामस्थ आणि पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रमुख अतिथी डॉ. प्रेरणा उबाळे यांनी आपल्या भाषणात शिक्षणातील संस्कार, शिक्षकांचे योगदान आणि हिंदी भाषेचे वाढते महत्त्व अधोरेखित केले. त्या म्हणाल्या, ‘‘संस्थापक अध्यक्ष शिरीष चिटणीस यांच्या दूरदृष्टी, जिद्द आणि शिक्षणावरील निष्ठेमुळे ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण शिक्षणाची मजबूत परंपरा निर्माण झाली आहे. शशिकांत जाधव यांनी तीन दशकांहून अधिक काळ विद्यार्थ्यांसाठी निस्वार्थ भावनेने कार्य केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांचे समर्पण किती महत्त्वाचे असते, याचे ते उत्तम उदाहरण आहेत.‘‘

त्या पुढे म्हणाल्या, ‘‘विद्यार्थ्यांच्या मनात मूल्यसंस्कार रुजविण्याचे कार्य शिक्षक करतात. शालेय जीवनात शिक्षकांकडून मिळालेले संस्कार आयुष्यभर साथ देतात. जाधव सरांनी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, शिस्त आणि जिद्द निर्माण केली. त्यांनी आयुष्यभर कमावलेली माणसे ही कोणत्याही आर्थिक संपत्तीपेक्षा मोठी आहेत.‘‘

हिंदी भाषेच्या महत्त्वावर भाष्य करताना डॉ. उबाळे म्हणाल्या, ‘‘आज जागतिक स्तरावर हिंदी भाषेला महत्त्व प्राप्त होत आहे. चीनसारखा देशही हिंदी भाषा शिकवत आहे. देशातील उद्योग, सेवा, पर्यटन, माध्यमे आणि शासकीय क्षेत्रात हिंदी जाणणाऱ्या युवकांसाठी रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी इंग्रजीबरोबरच हिंदी भाषेचेही ज्ञान आत्मसात करणे काळाची गरज आहे.‘‘ अध्यक्षीय समारोपात शिरीष चिटणीस यांनी जाधव यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, ‘‘निवृत्ती म्हणजे कार्याचा शेवट नसून नव्या सामाजिक जबाबदाऱ्यांची सुरुवात आहे. जाधव सरांनी पुढील काळातही विद्यार्थ्यांना क्रीडा आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी मार्गदर्शन करावे. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच या शाळेतील विद्यार्थ्यांनी कबड्डी, खो–खोसह विविध क्रीडा प्रकारांत तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले.‘‘

ते पुढे म्हणाले, ‘‘लोकमंगल संस्था शिक्षकांवर विश्वास ठेवते आणि त्यांना काम करण्याचे स्वातंत्र्य देते. त्यामुळेच या शाळेतील अनेक विद्यार्थी आज नेव्ही, मिलिटरी, एअरफोर्स तसेच इन्फोसिससारख्या नामांकित संस्थांमध्ये कार्यरत आहेत. या यशामागे शिक्षकांचे सातत्यपूर्ण परिश्रम आणि विद्यार्थ्यांप्रती असलेली तळमळ आहे.‘‘

# गुणवत्तापूर्ण शिक्षणावर शासनाचा भर–शालेय शिक्षण मंत्री

**ज्ञान सेतू ब्युरो**

मुंबई – राज्यातील पूर्व–प्राथमिक शिक्षण, खासगी शिकवणी वर्ग, शालेय पायाभूत सुविधा, शिक्षक प्रशिक्षण आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी व्यापक धोरणात्मक सुधारणा राबविण्यात येत असून, यासाठी आवश्यक कायदे आणि नियमावली लवकरच विधानमंडळासमोर मांडण्यात येणार असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधान परिषदेत दिली.

महाराष्ट्र विधान परिषद नियम २६० अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मंत्री भुसे यांनी शिक्षण क्षेत्रातील विविध उपक्रम, सुधारणा आणि आगामी धोरणांची सविस्तर माहिती दिली.

शालेय शिक्षण मंत्री भुसे म्हणाले की, तीन ते सहा वर्षे वयोगटातील बालकांना पूर्व–प्राथमिक शिक्षण देणाऱ्या सर्व खासगी केंद्रांची नोंदणी शालेय शिक्षण विभागाच्या प्री–स्कूल रजिस्ट्रेशन पोर्टलवर बंधनकारक करण्यात आली आहे. २४ एप्रिल २०२५ च्या शासन परिपत्रकानुसार ही प्रक्रिया सुरू असून आतापर्यंत सुमारे १३,८०० पूर्व–प्राथमिक केंद्रांची नोंदणी पूर्ण झाली आहे. यामुळे पालकांना केंद्रांची माहिती सहज उपलब्ध होईल आणि गुणवत्तापूर्ण व सुरक्षित शिक्षणाला चालना मिळेल. पूर्व–प्राथमिक शिक्षणासाठी स्वतंत्र अधिनियम तयार करण्याचे काम सुरू असून त्यामध्ये बालसुरक्षा, शिक्षक–विद्यार्थी गुणोत्तर, शैक्षणिक सुविधा, इमारतींचे निकष आणि खेळावर आधारित शिक्षण यांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच खासगी शिकवणी वर्गांच्या नोंदणी व नियमनासाठी ‘खासगी शिकवणी वर्ग नोंदणी व विनियमन अधिनियम, २०२६’ तयार करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली निरीक्षण समित्या स्थापन करण्यात आल्या असून त्या मार्गदर्शक सूचनांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवतील.

शाळांमधील मूलभूत सुविधांवर भर देताना मंत्री भुसे म्हणाले की, प्रत्येक शाळेत स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, सुरक्षित इमारत, ग्रंथालय, प्रयोगशाळा, क्रीडांगण, ई–सुविधा उपलब्ध करण्याचे उद्दिष्ट आहे.




## राधेश्याम झंवर यांची रेडिफमेल च्या पॅनलवर करिअर समुपदेशक म्हणून निवड

**ज्ञान सेतू ब्युरो**



**छत्रपती संभाजीनगर** – एक अग्रगण्य ईमेल आणि ई–कॉमर्स कंपनी रेडिफमेल.कॉम च्या प्रतिष्ठित पॅनेलवर राधेश्याम झंवर यांची ''करिअर समुपदेशक'' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे हे नुकतेच एका जाहीर झाले त्याबद्दल विद्यार्थी वर्गात आनंद व्यक्त होत आहे. त्यांचे अधिकृत पद ''रेडिफगुरू'' हे असणार आहे. त्यांना खालील दिलेल्या लिंकवर क्लिक त्यांचे प्रोफाइल पाहू शकता येईल.

विद्यार्थी आणि पालकांना त्यांच्या करिअर समुपदेशनाच्या गरजांसाठी मदत करण्याची ही संधी मिळणे हा एक मोठा सन्मान आहे. खालील लिंकवर क्लिक करून तुम्ही तुमचे प्रश्न विचारू शकता https://gurus.rediff.com/question/guru/radheshyam-zanwar/198.

## डॉ. शेख, डॉ. फर्जाना, सी.ए. रिजवाना यांना आयकॉन ऑफ नेशन अवॉर्ड

**ज्ञान सेतू ब्युरो**

**छत्रपती संभाजीनगर** – दिनांक १६ जुलै २०२४ (औरंगाबाद) नुकताच पुणे येथे वर्ल्ड सेवन वंडर्स पब्लिकेशन आयकॉनिक रेडियंट रेकॉर्ड वेलफेअर फाऊंडेशन यांच्या वतीने नॅशनल एक्सलन्स कॉन्फरन्स २०२४ चा सोहळा दिनांक १४ जुलै २०२४ रविवार रोजी पुणे येथील आचार्य अत्रे रंगमंच (चिंचवड) येथे प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

यावेळी डॉ. शेख (नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेंसरी) यांना अविरत ३६ वर्षात २ लाखावर रुग्ण सेवा, दर रविवार मोफत तपासणी शिबीर आयोजित केल्याबद्दल त्यांना आयकॉन ऑफ नेशन २०२४ पुरस्कार जम्मू–काश्मिर च्या महाराणी डॉ. सुहासिनी मदन (महाराजे जम्मू लोचन यांची वंशज) यांच्या उपस्थितीत मान्यवर श्री. संजीव जयंथ (डायरेक्टर, –२० नवी दिल्ली भारत सरकार), श्री. अतुल निकम (स्टेट डायरेक्टर, मणिपूर, मिझोरम, मेघालय), श्री. शिवाजी राजे जाधव (राजमाता जिजाऊ वंशज), श्री. विजयसिंह राजे भोसले (तंजावर वंशज) तामिळनाडू, श्री. यशवंत मानखेडकर (स्टेट डायरेक्टर, गोवा, महाराष्ट्र राज्य, भारत सरकार), मा. आरिफा मुल्ला (सिआयडी ऑफिसर, महाराष्ट्र पोलीस), इत्यादी यांच्या उपस्थितीत डॉ. शेख यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आयोजन जगप्रसिध्द डॉ. क्रांतिकुमार महाजन (डॉक्टर, वकील, लेखक, सोशल वर्कर) यांनी केले.

तसेच डॉ. शेख यांची मोठी कन्या डॉ. शेख फर्जाना शौकत यांना मागील १५ वर्षात तीन हजारच्यावर नॉर्मल डिलेव्हरी केल्याबद्दल व तसेच ५ किलोचे बाळ नॉर्मल डिलेव्हरी त्यांच्याकडे झाल्याबद्दल त्यांना आयकॉन ऑफ नेशन २०२४ पुरस्कार देण्यात आला. तसेच डॉ. शेख यांची मुलगी सी.ए. रिजवाना (पहिली मराठवाडयाची मुस्लीम सी.ए.) यांना सुध्दा आयकॉन ऑफ नेशन २०२४ पुरस्कार देण्यात आला. डॉ. शेख आणि त्यांच्या दोन्ही कन्यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## क. ब. चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात एम. ए.प्रथम वर्ष अभ्यासक्रमासाठी प्रा. वा. ना. आंधळे यांची कविता

**ज्ञान सेतू ब्युरो**



एरंडोल – येथील सुप्रसिद्ध कवी प्रा. वा. ना. आंधळे यांची ''आई, मला जन्म घेऊ दे'' या कवितेचा समावेश कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राच्या पदव्युत्तर एम. ए. मराठी ( ४१२) या क्रमांकाच्या साहित्य समीक्षा : सिद्धांत आणि उपयोजन या अभ्यास पत्रिकेत करण्यात आला असून विद्यापीठाचे या संदर्भातील पत्र त्यांना नुकतेच प्राप्त झाले आहे.

या कवितेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आस्वादक समीक्षा पद्धती अभ्यासता येईल. अभ्यास मंडळाच्या या उद्दिष्टाचा कवी आंधळे यांनी सहर्ष आनंद व्यक्त केलाय. सदर आई! मला जन्म घेऊ दे! या स्त्रीभ्रूण हत्येच्या विरोधातील भावकवितेला प्रचंड जनाधार लाभला असून या कवितेचे यामुळेच तब्बल पंचेचाळीस भारतीय भाषेत व बोली भाषेत उत्स्फूर्त अनुवाद संपन्न झाले आहेत.सेवाभावी सामाजिक संस्था आणि सुधारकांनी गेल्या पंधरा वर्षात या कवितेचे अदमासे एक लाख पोस्टर प्रकाशित केलेत.

यापूर्वी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ पुणे यांनी युवकभारतीच्या पाठ्यपुस्तकात सन २०१६ साली या कवितेला इयत्ता अकरावीकरिता समाविष्ट केले होते. तर गुजरात राज्यात शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये गुजरात माध्यमिक आणि उच्चस्तर माध्यमिक शिक्षण बोर्ड गांधीनगर यांनी इयत्ता – १२ वी विज्ञान या बोर्डाच्या प्रश्न पत्रिकेत आई, मला जन्म घेऊ दे ही संपूर्ण कविता प्रदर्शित करीत त्यावर विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्यात आले. परराज्यात खान्देशाच्या मराठी भाषिक कवीचे आणि कवितेचे यश निश्चितच उल्लेखनीय आहे.हे यश येथवरच थांबले नाही तर या कवितेवर प्रा. आत्माराम चिमकर एरंडोल, उच्च माध्यमिक शिक्षक चोपडेकर यांनी शोधनिबंधही सादर केले आहेत. जनसंवादी होणाऱ्या या कवितेला वेगवेगळ्या वर्गासाठी अभ्यासक्रमात मिळालेले स्थान पाहता कवी प्रा. वा. ना. आंधळे यांचे मानवतावादी विचारवन्त तथा जेष्ठ संशोधक प्रोफेसर डॉ. म. सु. पगारे, डॉ. दीपक खरात, प्रा. महेश सूर्यवंशी, प्राचार्य डॉ. अनिल लोहार, कवी ज्ञानेश्वर घुले,जेष्ठ कवी भगवान भटकर कवी निंबा पुना बडगुजर, कवी पी. जी. चौधरी सर, कवी विलास मोरे, रावसाहेब अरुण माळी, गणेश कुलकर्णी,प्रा. डॉ. बी. एफ. शेख यांचेसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# शैक्षणिक कार्यातील भरीव कार्याबद्दल शैलजा प्रमोद जोशी यांना आयडॉल महाराष्ट्र पुरस्कार

**ज्ञान सेतू ब्युरो**



पुणे – सावित्रीबाईचे विचार घेवून ग्रामीण भागातील महिलांना शिक्षण क्षेत्रात पुढे आणण्यासाठी ग्रामीण भागात उच्च शिक्षण देण्यासाठी करमाड येथे महाविद्यालय सुरु करून उच्च प्रतीचे शिक्षण देत नॅक कमिटी कडून महाविद्यालय अॅकरीडेशन मध्ये ++ चा दर्जा मिळवून देण्यात शैलजा जोशी यांना यश मिळाले आहे. याचे श्रेय त्यांनी गुणवत्तेला दिलेले महत्व आहे. त्यांच्या या शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचे कामं पाहता त्यांना दैनिक आधुनिक केसरीचा आयडॉल महाराष्ट्र पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

**त्यांचा थोडक्यात परिचय :**

**शैलजा प्रमोद जोशी,**

शिक्षण : बीएससी होम सायन्स, एमए इंग्रजी आणि हिंदी, बी.एड., B.Lib.Sc.आणि M.Lib (ग्रंथालय विज्ञान).

सुरुवात शिक्षक म्हणून काम त्यानंतर राजीव गांधी रात्रीचे महाविद्यालय मध्ये लेक्चरर म्हणून काम केले, नंतर तेथेच प्राचार्यपदावर रुजू झाले आणि नंतर करमाडच्या राजीव गांधी कॉलेजमध्ये ग्रंथपालपदावर कार्यरत. लहानपणा पासून शिक्षण क्षेत्राची आवड, घरात शैक्षणिक वातावरण असल्यामुळे या क्षेत्रात छान प्रगती करता आली, स्वतःची शैक्षणिक संस्था असावी व आपल्या संस्थेतून अनेकांना घडवून मोठ मोठ्या पदावर कामं करताना पहाण्याचे स्वप्न होते, त्यासाठी खूप संघर्ष करून स्वतःची शिक्षण संस्था उभी केली, पण एखादी संस्था उभी करणे व ती यशस्वीपणे चालवणे किती अवघड असते याचे चांगले व वाईट अनुभव खूप घेतले. खूप शिकायला मिळाले, आजूबाजूला वावरणारे चेहरे आपण ओळखतो त्यापेक्षा कितीतरी वेगळे असतात हे प्रत्यक्ष अनुभवातून पाहायला मिळाले.

अतिशय खडतर प्रवास करून कॉलेज उभे केले व आज हजारो विद्यार्थी विद्यार्थीनी येथून आपले स्वप्न पूर्ण करीत आहेत याचा अतिशय आनंद होत आहे.

राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय करमाड हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादशी संलग्न आहे. त्याची स्थापना डॉ. प्रमोद काशिनाथराव जोशी यांनी १९९४ मध्ये सुरुकेले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे या उद्देशाने हे महाविद्यालय सुरू करण्यात आले आहे. राजीव गांधी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय स्थलांतरित करण्यासाठी पालक संस्थेद्वारे ग्रामीण स्थान निवडले जाते कारण अजूनही जागतिक युगात, भारतातील बहुसंख्य लोकसंख्या खेड्यांमध्ये राहते आणि म्हणूनच भारतात ग्रामीण शिक्षणाचा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. महाविद्यालयासाठी सध्याचे स्थान निवडण्यामागील कारण म्हणजे हे सर्व शैक्षणिक गुण विकसित करणे. महाविद्यालय केवळ शैक्षणिक सुविधाच पुरवत नाही तर सामाजिक विस्ताराच्या कार्यासाठी देखील कार्य करते, याचा परिणाम म्हणून दोन गावांना निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त झाला जो सटाणा आणि लाडगाव–हिवरा या महाविद्यालयाच्या NSS ने दत्तक घेतले आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे ही एकमेव उच्च शैक्षणिक संस्था आहे ज्यामध्ये बीए, बीकॉम आणि बीएससी असे तीन शाखा आहेत. मुली महाविद्यालयात जास्त आहेत कारण, त्यांच्या पालकांना भीती आणि असुरक्षिततेच्या भावनेमुळे शिक्षणासाठी लांब प्रवासाचा धोका पत्करायचा नाही. विद्यार्थ्यांना उत्तमोत्तम सुविधा देण्याचा महाविद्यालयाचा प्रयत्न असतो. त्याचे उदाहरण म्हणजे कोणत्याही एजन्सीकडून वीजपुरवठा होत नाही. महाविद्यालयाने निर्माण केलेली सर्व विद्युत उर्जा महाविद्यालय स्वतः सौर पॅनेलद्वारे वापरते.

**भविष्यातील उद्दिष्टे:**

✻ ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये विशेषत: मुलींमध्ये शिक्षणाची आवड आणि गुणवत्ता वाढवण्यासाठी कार्य करणार.

✻ विद्यार्थ्यांना केवळ मुख्य प्रवाहातील विषयांमध्येच नव्हे तर व्यावसायिक आणि तांत्रिक अभ्यासक्रमांमध्येही प्रशिक्षण मिळावे जेणेकरून त्यांना उद्योगासाठी त्याचा खूप मोठा फायदा होईल. म्हणून तांत्रिक शिक्षण सुरु करणार.

**स्वारस्ये:**

✻ संगीत आणि विशेषतः शास्त्रीय संगीत, रेखाचित्र आणि वाचन.

**सामाजिक उपक्रम:**

✻ समन्वयक अंगणवाडी सेवा

✻अध्यक्ष, स्वप्नपूर्ती महिला मंडळ

✻ सचिव, भारतीय संस्कृती सौवर्धन शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद

✻सचिव, चिंतामणी हायर अँड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी,

✻माजी सदस्य अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, शेतकरी संघटना.

✻ श्रमिक शिक्षण आणि महिलांच्या प्रगतीच्या जागृतीसाठी कार्य.

# दप्तराचे ओझे

**ज्ञान सेतू ब्युरो**



शाळेचा पहिला दिवस होता.पावसाची सर येवून गेली होती.अस्तावलेलं मन आता थोडं शांत झालं होतं. तशा जमीनीला पडलेल्या भेगाही आज दिसत नव्हत्या.अशातच सुमंत आपल्या शेतात वखरानांगराची कामे करीत होता. शेती पिकत जरी नसली तरी ती शेती पिकविण्यासाठी तो काबाड मेहनत करीत होता.

सुमंतला एक मुलगीही होती. चारुशिला नाव होतं तिचं.ती त्या काबाडकष्ट करणा–या माणसाची मुलगी असली तरी ती शरीरानं धडधाकट नव्हती.ती अत्यंत नाजूक होती.

चारुशिला नाजूक होती.ती आता चौथीत गेली होती.कॉन्व्हेटचं प्रस्थ असल्याने सुमंतनेही तिचे नाव कॉन्व्हेंटमध्ये टाकले होते.दररोज ती नित्यनेमाने शाळेत जात होती.मात्र वाढत्या दप्तराच्या ओझ्याने व शाळेचे जिने चढावे लागल्याने ती त्रस्त होती.सायंकाळी घरी आल्यावर सारखी हात दुखते,पाय दुखते म्हणत जेव्हा ओरडायची,तेव्हा सुमंतच्या डोळ्यातून साहजिकच अश्रू निघायचे.यामुळे सुमंतलाही वेदना व्हायच्या व तोही घायाळ व्हायचा.त्याला विचार यायचा की आपली मुलगी जर एवढी त्रस्त आहे तर हिच्यासारखी बाकीच्या मुली त्रस्त नसतील काय?विचारांचा अवकाश त्याने हे दप्तराचे ओझे कमी करण्याचा निर्णय घेतला.तो सदोदित विचार करु लागला की हे दप्तराचे ओझे कसे कमी करता येईल.

तो शेतकरी जरी असला तरी तो उच्चशिक्षित होता.कुठे अर्ज पाठवायचे व कसे अर्ज लिहायचे याचे त्याला भान होते. तसेच शासनाशी कसे लढायचे हेही त्याला ठाऊक होते. आज तो शासनाशी लढत होता.अर्जावर अर्ज देत होता.नव्हे तर आता दप्तराच्या ओझ्याची याचिका त्याने न्यायालयातही टाकली होती.

न्यायालयात खटला रंगत चालला होता.

**अंकुश शिंगाडे, नागपूर**
**९३७३३५९४५०**

तसा दप्तराच्या ओझ्याचा प्रश्न ऐरणीवर होता.वेगवेगळ्या क्लृप्त्या द्वारे दप्तराचे ओझे कमी कसे करता येईल.हे पटवून देवू लागला. देशात नवी पार्टी सत्तेवर आली होती.देश डीजीटल बनवला होता.तशातच दप्तराचं ओझंही डीजीटल बनवावं हे ही सुमंतच्या मनात आलं.तसा न्यायालयात डीजीटल इंडीयाचा प्रस्ताव ठेवण्यात आला.न्यायालयाच्या ते लक्षात आले होते.दप्तराच्या ओझ्याने मुले कशी घायल होतात हेही समजलं होतं.त्यांनी डीजीटल पाठ्यपुस्तकाचा आदेश दिला. आज पाठ्यक्रम बदलला होता.पाठ्यपुस्तके बंद झाली होती.काम्प्युटरचे टॅब विद्यार्थ्यांना वाटप झाले होते.विद्यार्थी शाळेत पाठ्यपुस्तके व नोटबूक न नेता फक्त टॅब्लेट नेत होते व डीजीटल अभ्यास करीत होते. महत्वाचं म्हणजे लहान मुलांना आपण देवाघरची फ ुलं म्हणत असलो तरी मुलांसाठी काय करतो.काहीच करीत नाही.सर्वांची मुले दप्तराच्या ओझ्याने सारखी ओरडत असतात. सध्या डीजीटल जमाना आहे.या डीजीटल काळात या पाठ्यपुस्तक व नोटबुकाची गरज नाही.अशा काळात पाठ्यपुस्तकाऐवजी व नोटबुकाऐवजी जर टॅब्लेट दिले गेले आणि ते कसे चालवायचे ते शिकवल्या गेले तर खरंच पाठ्यपुस्तकाच्या ओझ्याचा त्रास निश्चितच कमी होईल. सुमंतने पाठ्यपुस्तकाचे ओझे कमी करण्यासाठी जो लढा दिला,तो खरंच वाखाणण्याजोगा होता.खरंच त्याच्या लढण्याने चारुशिलेचीच नाही तर संबंध देशातील मुलांचे ओझे कमी झाले होते व ते आनंद महसूस करीत होते.तसेच सुमंतच्या या लढ्याने शेतीकडे दुर्लक्ष झाले असले तरी मुलांमध्ये आनंद निर्माण झाला होता व चांगले समाधान सुमंतच्या मनात निर्माण झाले होते व तो राहत महसूस करीत होता.

# टीईटी पेपरफुटी प्रकरणात दोषींवर थेट मकोका लावणार; भुसेंची विधानसभेत मोठी घोषणा

**ज्ञान सेतू ब्युरो**

मुंबई – महाराष्ट्रातील शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पेपरफुटी प्रकरणामुळे पुन्हा एकदा परीक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत दोषींवर थेट संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा (मकोका) अंतर्गत कारवाई करणार असल्याची माहिती राज्याचे शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात दिली.

२८ जून २०२६ रोजी होणाऱ्या टीईटी परीक्षेचा प्रश्नपत्रिका संच परीक्षेच्या एक दिवस आधीच फुटल्याचे तपासात समोर आले. या प्रकरणातील दोषींवर संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा (मकोका) अंतर्गत कारवाई करण्याची तयारी सरकारने दर्शवली आहे.

**पोलिसांच्या कारवाईत तीन आरोपी ताब्यात**

पोलिसांना २७ जून रोजी टीईटी परीक्षेची प्रश्नपत्रिका विक्रीसाठी उपलब्ध असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत सापळा रचला आणि तीन संशयितांना ताब्यात घेतले.

चौकशीत आरोपींकडे २८ जूनच्या परीक्षेची मूळ प्रश्नपत्रिका आढळून आली. शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर ती प्रश्नपत्रिका खरी असल्याचे स्पष्ट झाले.

या प्रकरणी मुख्य आरोपी राजू श्री प्रयाग शाव याच्यासह अन्य दोन आरोपींवर भिवंडीतील कोनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींवर भारतीय न्याय संहिता तसेच महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा अनुचित मार्गास प्रतिबंध अधिनियम २०२४ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

**एसआयटीकडून देशभर तपास**

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस महासंचालकांच्या आदेशाने विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले आहे. या प्रकरणाच्या तपासासाठी




पोलिसांची पथके बिहार, हरियाणा आणि दिल्ली येथे रवाना करण्यात आली आहेत.

पेपरफुटीचे जाळे किती मोठे आहे, याचा शोध घेण्यासाठी तपास यंत्रणा काम करत आहे.

उमेदवारांना दिलासा; फेरपरीक्षा शुल्काशिवाय

पेपरफुटीमुळे प्रभावित झालेल्या उमेदवारांसाठी फेरपरीक्षा घेतली जाणार असून त्यासाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नसल्याचे दादा भुसे यांनी स्पष्ट केले.

तसेच भविष्यात टीईटीसह इतर स्पर्धा परीक्षा अधिक पारदर्शक करण्यासाठी पुढील वर्षापासून परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्याबाबत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येणार आहे.

विरोधकांचा सरकारवर निशाणा

टीईटी पेपरफुटीच्या मुद्द्यावरून विरोधकांनी सरकारवर टीका करत सभागृहात आक्रमक भूमिका घेतली. या प्रकरणाची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करत विरोधकांनी निषेध नोंदवला.

दरम्यान, भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी प्रश्नपत्रिका महाराष्ट्राबाहेर छापण्याची पद्धत बंद करून त्या राज्यातच छापण्यात याव्यात, अशी मागणी केली.

## सुभेदार रामजी मालोजी आंबेडकर माध्यमिक विद्यानिकेतन येथे रा.स्व. संघातर्फे वृक्षारोपण

**ज्ञान सेतू ब्युरो**



पुणे – रामवाडी येथील सुभेदार रामजी मालोजी आंबेडकर विद्यानिकेतन येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त संघाच्या कर्वेनगर येथील सह्याद्री प्रभात शाखा व भूमी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने शाळेच्या प्रांगणात वृक्षावरोपण करण्यात आले.

जेष्ठ स्वयंसेवक उल्हास सावळेकर यांच्या पुढाकाराने झालेल्या या वृक्षारोपण कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थांना वृक्षावरोपणचे व वृक्ष संगोपनाचे महत्व सांगण्यात आले. नंतर शाळेच्या मैदानात पिंपळ, चिंच, चाफा, मोगरा या देशी रोपांचे वृक्षावरोपण करण्यात आले. याकामी संघाचे उल्हास सावळेकर, प्रकाश देशपांडे, प्रमोद कुलकर्णी, नंदकुमार कुलकर्णी, सुरेंद्र प्रधान तसेच भूमी संस्थेचे सावनी सावळेकर, साक्षी गुप्ता, धीरज मोरे, गायत्री पांगारे, जागृती पोवार, तन्वी शर्मा, अवनी मेढे, यांनी रोपे लावली.

याप्रसंगी विद्यानिकेतनचे शाळा प्रमुख सुभाष वेताळ, सहाय्यक शिक्षिका वैशाली देवकाते, सहाय्यक शिक्षक भूषण जोशी, शिक्षक श्रीकृष्ण मुंढे, नीता पावडे, संगीता देवकर, कल्पना ढोले, आदेश नाईक यांचे सहकार्य लाभले.

३५२ वा शिवराज्याभिषेक दिन शाळेमध्ये साजरा करण्यात आला.याप्रसंगी संघाचे प्रकाश देशपांडे यांनी शिवराज्याभिषेक दिनाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमास उपस्थित विद्यार्थांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला.या प्रसंगी शाळेचे सर्व शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## वालसेकर, शेजूळ, जैस्वाल, पवार व मृणमयी जोशी यांना साबळे स्मृती पुरस्कार प्रदान

**ज्ञान सेतू ब्युरो**

छत्रपती संभाजीनगर – कालकथीत भीमराव साबळे स्मृती प्रित्यर्थ विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्याना यावर्षी पासून पुरस्कार सुरु करण्यात आले व त्यासाठी यावर्षी उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार एमसीएनचे मुख्य संपादक देव शेजूळ यांना, उत्कृष्ट उद्योजक पुरस्कार वालसेकर मेटल इंडस्ट्रीचे संस्थापक चंद्रकांत वालसेकर यांना, उत्कृष्ट समाजसेवा पुरस्कार राजू भाऊ जैस्वाल यांना, उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार पृथ्वीराज रामदेव पवार यांना तर उत्कृष्ट क्रीडा पुरस्कार राष्ट्रीय टेनिसपटू मृण्मयी मनोज जोशी संभाजीनगर यांना एका शानदार सोहळ्यात देण्यात आले.

या पुरस्कार सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून प्रवीण विलास शिशुपाल, कार्यासन अधिकारी मुंबई मंत्रालय हे होते व शिक्षण महर्षी दादासाहेब म्हस्के यांच्या शुभहस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन नागसेन मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्थेचे अध्यक्ष महादेव भिमराव साबळे यांनी केले होते.

शिक्षण महर्षी दादासाहेब म्हस्के यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की महादेव साबळे यांनी त्यांच्या वडिलांचे स्वप्न पूर्ण केले याचा मला आनंद आहे, भीमराव साबळे हे अतिशय कष्टाळू व्यक्तिमत्व होते, आपला समाज पुढे यावा यासाठी त्यांनी खूप मेहनत घेतली व आज आपल्या समाजातील अनेक उद्योजकांकडे बघून समाजाचे भवितव्य उज्वल होत आहे असे सांगितले.


हा पुरस्कार आमच्यासाठी प्रेरणा देणारा आहे यामुळे यापुढे आम्ही अधिक जोमाने काम करू असे पुरस्कार्थिनी यावेळी सांगितले. हा कार्यक्रम कुलस्वामिनी मंगल कार्यालय येथे संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अँकर भावना यांनी उत्कृष्टरित्या पार पाडले. या कार्यक्रमात कृष्णा भंडारी, किशोर गडकर, दामू आण्णा कांबळे,नागेश जावळे, किशोर दामोदर, नंदु वाकेकर, मुकेश गायकवाड, मनोज पारधे, शेखर ढोले, मनोज सरीन, स्वप्निल जाधव हिरालाल साबळे, प्रथमेश साबळे, प्रतीक साबळे, सुधाकर गंगावणे, राजू गायकवाड, विनोद गडकरी, राजू बर्डे, आनंद पगारे, प्रियाआनंद पगारे, मिलिंद आठवले, शीलवंत गोपनारायण यांच्यासह रंजना पगारे, अंजली भुईगड, प्रियांका पगारे, मयुरी पगारे, रेखा, प्रियांका किशोर दामोदर, महादेव साबळे ममता शेजवळ, अश्विनी पंडित, सरनम साबळे, मानस साबळे, स्वाती जाधव, यश पगारे आणि विविध क्षेत्रातील महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या आभार प्रदर्शनाची जवाबदारी विलास जोगदंडे यांनी पार पाडली.

## भेलके महाविद्यालयात पोस्टर प्रदर्शनातून अर्थसाक्षरता

नसरापूर – डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नसरापूर येथील भेलके महाविद्यालयात २०२६-२७ या वर्षाच्या केंद्रीय अर्थसंकल्पावर आधारित प्रदर्शनाचे आयोजन अर्थशास्त्र विभागाच्या वतीने करण्यात आले. या उपक्रमात कला व वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. अर्थसंकल्पातील विविध बाबी, योजना आणि आर्थिक तरतुदी यांची सखोल माहिती पोस्टर व सादरीकरणाच्या माध्यमातून मांडली.

या प्रदर्शनात संरक्षण, ऊर्जा , शिक्षण, आरोग्य, कृषी, पायाभूत सुविधा, डिजिटल अर्थव्यवस्था, स्टार्टअप्स आणि रोजगार निर्मिती यांसारख्या क्षेत्रांवर अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदींवर विशेष भर देण्यात आला. विद्यार्थ्यांनी आकर्षक पोस्टर, चार्ट आणि सादरीकरणाच्या माध्यमातून महत्त्वाच्या योजनांचे विश्लेषण करत इतर विद्यार्थ्यांना अर्थसंकल्पाची सुलभ व प्रभावी माहिती दिली. या प्रदर्शनाला प्राचार्य डॉ तुषार शितोळे यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक केले. तसेच त्यांनी अर्थसंकल्पाचे महत्त्व आणि त्याचा देशाच्या आर्थिक विकासावर होणारा परिणाम याविषयी मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अर्थसंकल्पातील धोरणे समजून घेण्याची आणि त्यावर चिकित्सक दृष्टिकोन विकसित करण्याची संधी मिळाली.

## करिअर गाईड



अनिता चव्हाण-राठोड
कै. गुरुदयालसिंग राठोड माध्यमिक आश्रमशाळा,
गराडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर.
8605655091

### करियर निवडताना...

■ **मुलांचा कल**

मुलांची आवड आणि कल या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. एखाद्या गोष्टीची आवड असते, पण त्या गोष्टीसाठी आवश्यक असलेला नैसर्गिक कल किंवा कौशल्य नसेल, तर ते फार पुढे जाऊ शकत नाहीत. उदाहरणार्थ, एखाद्याला क्रिकेटची आवड असू शकते, पण त्याचा शारीरिक स्टॅमिना, खेळातील समज, वेग या बाबतीत तो मागे असू शकतो. म्हणून पालकांनी मुलाच्या कलाचा नीट अभ्यास करूनच निर्णय घ्यावा.

■ **मुलांनी मिळविलेली कौशल्ये**

आजच्या काळात केवळ पुस्तकातील ज्ञान पुरेसे नाही. मुलांनी शाळा-कॉलेजशिवाय इतर ठिकाणी शिकलेल्या कौशल्यांकडेही लक्ष दिले पाहिजे. उदाहरणार्थ, कोडिंग, ॲनिमेशन, भाषाशिक्षण, फोटोग्राफी, वक्तृत्व, लेखन, संवादकौशल्य, नेतृत्वगुण... या सर्व गोष्टी त्यांना वेगळ्या प्रकारे घडवतात. त्यांचं हे 'बाह्य' शिक्षण त्यांच्या करियरसाठी खूप उपयुक्त ठरू शकतं.

■ **मुलांची नैसर्गिक प्रतिभा**

काही मुले विशिष्ट क्षेत्रात जन्मतःच चपखल असतात. तीच त्यांची नैसर्गिक प्रतिभा. काहींना रंगरेषांमधून कल्पना व्यक्त करता येतात, तर काही जण नृत्यामध्ये सहजतेने भाव व्यक्त करतात. अशा नैसर्गिक गुणवत्तेचा योग्य वेळी शोध घेतला, आणि त्या मार्गाने प्रोत्साहन दिले, तर त्या क्षेत्रात ते लखलखीत यश मिळवू शकतात.

पालकांनी केवळ समाजाच्या अपेक्षा किंवा स्वतःच्या अपूर्ण आकांक्षा मुलांवर लादण्याऐवजी, त्यांच्या अंगभूत क्षमता, आवड, कल, आणि कौशल्यांचा अभ्यास करून करिअर निवडीत मार्गदर्शन करावे. योग्य दिशा, सकारात्मक पाठबळ आणि समजूतदार संवाद यामुळे मुले केवळ यशस्वीच नव्हे, तर समाधानी आणि सशक्त व्यक्तिमत्व बनू शकतील.

■ **पालकांनी काय करावे?**

- प्रत्येक मूल वेगळे असते, म्हणून इतर कोणाशीही आपल्या मुलांची तुलना करू नये.
- मुलांशी सुसंवाद साधावा. त्यांचे निरीक्षण करावे.
- त्यांना वेगवेगळ्या गोष्टींचा अनुभव घेऊ द्यावा.
- सगळ्यात महत्त्वाचं त्यांच्यावर आपल्या अपेक्षांचं ओझं टाकू नये. "करिअर निवडीचं स्वातंत्र्य द्या,

पण असा सल्ला द्यायला विसरू नका – "कोणत्याही क्षेत्रात जा, पण जिथे जाशील तिथे टॉपवर जा!" मग पाहा, तुमचं मूल स्वतःची वाट शोधून यशाच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचल्याशिवाय राहणार नाही !

## प्रत्येक पालकांसाठी हे खूप महत्वाचे...

रात्री झोपण्यापूर्वी गॅस सिलेंडरचा नॉब बंद करता येत नाही. आखूड आणि तंग कपड्यांपेक्षा अंगभर शुद्ध सुती कपडे वापरण्याचं महत्त्व समजत नाही. जंक फूड मधला धोका लक्षात येत नाही. रोजच्या आयुष्यात प्लॅस्टिकचा वापर कसा टाळावा,हे कळत नाही. सिग्नलला थांबल्यावर दुचाकी बंद करावी, यातलं पर्यावरण महत्व कळत नाही. कापडी पिशवीचा वापर का वाढवायला हवा, हे समजत नाही. बाहेरून अन्न पार्सल आणायला जाताना सोबत स्टीलचा डबा घेऊन जावा, गरम पदार्थ प्लॅस्टिक कंटेनर किंवा फॉइल मधून पार्सल आणू नये, हे विज्ञान शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना कळू नये? कृत्रिम शीतपेये कशी हानिकारक आहेत, हे कळत नाही. मग विज्ञानाचा नेमका अभ्यास ही मुलंमुली करतात तरी कशी?

मग आयुष्य उत्तम जगण्यासाठीची सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक, भावनिक, शैक्षणिक, पर्यावरणविषयक, वैज्ञानिक, आर्थिक आणि राष्ट्रीय चारित्र्य विषयक जीवनदृष्टी आहे का? ते सर्वांगीण जीवनपोषण आपल्या मुलामुलींना कसं मिळणार, कुठून मिळणार, कोण देणार ह्याचा विचार आपण केला आहे का?

हे प्रश्न इतके लख्ख समोर दिसल्यावर दोन महिन्यांपूर्वी आम्ही पालकांसाठी एक सत्र आयोजित केलं होतं. त्यामध्ये "आपल्या मुलांनी कोणत्या गोष्टी शिकाव्यात,असं तुम्हाला वाटतं?" असा प्रश्न मी उपस्थित पालकांना विचारला. बहुतेक सगळ्या पालकांची गाडी 'शाळेच्या परीक्षेत भरपूर मार्क' याच गोष्टीपाशी अडली होती. नॅशनल एन्ट्रन्सेस मध्ये स्कोअर झाला की बस्स.. डोक्यात एवढा एकच विचार.. आपल्या जगण्याची गुणवत्ता फक्त पैसा कशी ठरवणार?

आपल्या मुलामुलींचा सामाजिक, सांस्कृतिक, बौद्धिक बुद्धिभेद का होतो आहे? "मी, माझं, मला, फक्त माझ्यापुरतं" हा फॉर्म्युला आपल्या मुलांच्या भविष्याच्या दृष्टीनं कितपत उपयोगी पडणार आहे? "आयुष्यात पैसा हेच एकमेव सत्य आहे" ही धारणा आपल्या मुलांना सुरक्षित आणि स्वस्थ जगवेल का? असे प्रश्नच पालकांना पडत नाहीत, ह्याचं मला फार आश्चर्य वाटलं आणि तेवढंच वाईटही वाटलं. आपल्या मुलामुलींना चांगले मित्र मैत्रिणी नाहीत, चांगलं वाचनीय साहित्य त्यांना ठाऊक नाही, विद्वानांचा सहवास नाही, आपल्याला मिळालेल्या चांगल्या आयुष्याविषयी कृतज्ञता नाही. निदान आपल्या चांगल्या आरोग्याविषयी तरी दैनंदिन जीवनात बदल घडवायला हवा, तर तेही नाही.

जर असं असेल तर हा केवळ शिक्षणव्यवस्थेचा दोष नाही. नव्या पिढीला घडवण्याचं धोरण समाजानंच ठरवण्याची गरज आहे. कारण, कुठलाच पुस्तकी अभ्यासक्रम आणि मार्कलिस्ट आपल्या मुलांच्या सुदृढ, समंजस आणि शहाण्या जगण्याचा पाया घालण्यासाठी पुरा पडणार नाही. शाळा, कुटुंब आणि समाज या तिघांनीही एकत्र येऊन काही नीति ठरवली तर हे चित्र बदलता येईल. समाजातल्या प्रत्येकानं 'ही माझी जबाबदारी आहे' असं मान्य करुन सक्रिय सहभाग घेतला नाही, तर आपल्या पुढच्या पिढ्यांची आयुष्याची वस्त्रं अशी फाटत राहतील, ज्यांना लावायला ठिगळं अपुरी पडतील.

क्रमश:

# गुरुजींचे ऋण कसे फिटते?

**ज्ञान सेतू ब्युरो**

पोस्टमनने आणलेले पोस्ट हातात तोलत दत्तू ऑफिसकडे आला. चार पाच चेहरे त्याच्याकडे नेहमीच्या आशेने पहात होते. हो..कारण या आशा दीप नावाच्या वृद्धाश्रमात पन्नास एक वृद्ध रहात असले तरी पत्र यायची ती फक्त मोजक्या चार पाच जणांनाच. त्यामुळे अधून मधून पोस्टमन येउन पोस्ट गेटवरच दत्तूकडे देउन जायचा, तेंव्हा हे ठरावीक लोकच त्यांच्या नावाचे पत्र आलय का हे ऐकायला उत्सुक असायचे. बाकीचे सिनीयर सिटीझन्स आपले त्याच्याशी काही देणे नाही या अविर्भावात, बाजूच्या वाचन कक्ष्यावर पेपर किंवा पुस्तक घेउन वाचत बसलेले असत. किंवा मग कोप-यावरच्या हॉलमधे जाउन कैरम, पत्ते खेळत बसत असत.

त्यामुळे दत्तूने जेंव्हा हाक दिली देशमुख काका... तुमच्या नावाचं पाकीट आलय..घेउन जा.. तेंव्हा पुस्तक वाचनात गढून गेलेले आप्पा देशमुख आधी चपापलेच. आपल्याला कोणाचे पत्र आले असेल? असा आधी विचार करुन त्यांनी शेजारी बसलेल्या नाना वर्टीकर यांच्याकडे पाहिले. नानांनी तोंडात बार भरला होता. मानेनेच जाउन या..बघा काय आलय.. असे नानांनी अप्पांना सुचवले तसे अप्पा देशमुख लगबग ऑफिसमधे आले. रजिस्टरला नोंद करुन ते जाडजूड एनव्हलप आपल्या हातात घेउन ते उठले. पाकीट दिल्लीवरुन स्पिड पोस्टने पाठवलेले होते.

त्यावर पाठवणा-याचे नाव नव्हते. फक्त एवढेच लिहीले होते

इफ अन डिलीव्हरड, प्लीज रिटर्न टू
अशिस्टन्ट सेक्रेटरी - प्लानिंग
मिनिस्ट्री ऑफ फायनान्स
१०, संसद मार्ग , न्यू दिल्ली

आप्पा देशमुख ला दिल्लीवरुन कसलेसे जाडजूड टपाल आलय हे एव्हाना दत्तूकरवी सर्वांना समजले होते.

सारेजण आप्पांभोवती जमा झाले..

मग एक एक प्रतिक्रिया येउ लागल्या..

काय रे आप्पा, या वयात लव्ह लेटर आले काय तुला? एवढं दिवस सांगितलं नाहीस आम्हाला ते.. आबा क्षिरसागरने आप्पांची खेचली आणि एकच हास्य कल्लोळ झाला.

अरे आबा..लव्ह लेटर नसेल..उत्कृष्ट शिक्षकाचा पुरस्कार घ्यायला दिल्लीला बोलावलं असेल राष्ट्रपतींनी आप्पाला..तो मास्तर म्हणून रिटायर होउन पाच वर्षे झालीयेत हे लक्षात नसेल आले त्यांच्या.. बापू देशपांडे बोलले तसे सगळे पुन्हा एकदा हसले.

छे रे..बापू..अरे पत्र बघ कोणाकडून आलय..डिपार्टमेंट ऑफ प्लानिंग , मिनिस्ट्री ऑफ फायनान्स . आयला, म्हणजे आप्पाला प्लानिंग कमिशन मधे घेताहेत की काय? अभिनंदन आप्पा..!! पांडू काका पवार बोलले.

तेवढ्यात आपला तंबाखूचा तोबरा थुंकून परत जागेवर आलेल्या नाना वर्टीकरने सगळ्यांना शांत केले..



अरे बाबांनो..असा अंदाज लावत बसण्यापेक्षा आप्पाला ते पाकीट उघडू तरी द्यात. काय ते कळेलच...ए आप्पा.. उघड रे ते पाकीट..

**सुनिल गोबुरे, पुणे**

आप्पानी नानांच्या आदेशा प्रमाणे पाकीटाची एक कड कात्रीने सावकाश कापली. आता तसेही त्यांच्या आयुष्यात काही सिक्रेट्स नव्हते. तीन वर्षापूर्वी पत्नी गेली अन सुने बरोबर पटेनासे झाले तसे ते मुलाला सांगून स्वतःच या वृद्धाश्रमात येउन राहिले होते. मुलगा महिन्यातून एकदा येउन त्यांना भेटून जायचा. शाळेची पेन्शन यायची त्यात त्यांचे भागायचे. आता हा वृद्धाश्रम आणि इथले मित्र हेच त्यांचे कुटुंब झाले होते. आता त्यांचे खाजगी, वैयक्तिक असे काही नव्हतेच. म्हणूनच हे पाकीट सर्वांसमक्ष उघडायला त्यांना कुठली भिड वाटली नाही.

पाकीटात तीन चार गोष्टी होत्या. आधी एक ग्रिटींग कार्ड निघाले. त्यावर गुरु आणि शिष्याचे एक सुंदर भित्तीचित्र होते व त्यावर सुवाच्य अक्षरात एक मेसेज लिहीला होता..

माझ्या शालेय जीवनातच मला जीवनाची खरी दिशा दाखवणारे माझे देशमुख गुरुजी यांना शिक्षक दिना निमीत्त सप्रेम नमन.

खाली फक्त नाव होते..आरती.

नानांनी ते ग्रिटींग पाहिले व म्हणाले..अरे आप्पाच्या कोणा विद्यार्थिनीचे शुभेच्छापत्र आहे हे..आरती नावाच्या...

आप्पा विचारात पडले. पस्तीस वर्षांच्या शिक्षकी कारकिर्दीत, आरती नावाच्या अनेक मुली त्यांच्या विद्यार्थिनी होत्या. तीन चार विद्यार्थिनी त्यांना आठवतही होत्या. पण ही त्यातली नक्की कोण हे त्यांना लक्षात येत नव्हते.

ते बघ आत एक चिठ्ठी देखील आहे ती वाच..

आतून एक छान गुळगुळीत पण उच्च प्रतिच्या स्टेशनरीचा कागद बाहेर आला व त्यावर सुवाच्य अक्षरात एक पत्र लिहीले होते. आश्रमात पत्र वाचन हा बापू देशपांडेंचा प्रांत. आप्पांनी त्यांच्याकडे ते पत्र वाचायला दिले. बापू देशपांड्यांनी आपल्या खणखणीत आवाजात पत्र वाचायला सुरु केले.. **(क्रमशः)**

# सूक्ष्मजीवशास्त्र आणि सूक्ष्मजीव

**ज्ञान सेतू ब्युरो**

सर्वांना नमस्कार,

मी पाहिले की मायक्रोबायोलॉजी हा शब्द लोकांना माहिती नाही. म्हणून आज मी मायक्रोबायोलॉजी, सूक्ष्मजीव आणि विविध क्षेत्रातील त्यांची भूमिका यावर एक लेख लिहित आहे. प्रत्येक मायक्रोबायोलॉजिस्टला सूक्ष्मजीव बद्दल एक तथ्य माहित आहे, '' जर सूक्ष्मजीव नसतील तर जीवन नाही''

जगभरात सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ आहेत जे आपल्या जीवनात बदल घडवून आणतात आपले अन्न सुरक्षित आहे याची खात्री करणे, रोगांवर उपचार करणे आणि प्रतिबंध करणे, हरित तंत्रज्ञान विकसित करणे किंवा हवामान बदलामध्ये सूक्ष्मजीवांच्या भूमिकेचा मागोवा घेणे. सूक्ष्मजीवशास्त्रज्ञांनी सूक्ष्मजंतू समजून घेऊन अनेक महत्त्वाच्या जागतिक प्रश्नांची उत्तरे देण्याचे ध्येय ठेवले आहे. पृथ्वीवरील सर्व जीवसृष्टीसाठी सूक्ष्मजीव अत्यंत महत्त्वाचे आहेत. अष्टपैलू जीव म्हणून, ते जैवविघटन, जैवविकृती, हवामान बदल, अन्न खराब होणे, महामारीविज्ञान आणि जैवतंत्रज्ञान यासारख्या विविध जैवरासायनिक प्रक्रियांमध्ये प्रमुख भूमिका बजावतात. आपल्या दैनंदिन जीवनात, सूक्ष्मजीवशास्त्राचा वापर केला जातो आणि त्याचा महत्त्वपूर्ण प्रभाव पडतो. मायक्रोबायोलॉजीचा वापर अन्न उत्पादनासह दैनंदिन जीवनातील अनेक बाबींमध्ये केला जातो, बी बायोडिग्रेडेशन, व्यावसायिक वस्तूंचे उत्पादन आणि अनुवांशिक अभियांत्रिकी. ते विविध पदार्थांमध्ये आवश्यक आहेत. मायक्रोबायोलॉजिस्ट सार्वजनिक आरोग्याशी संबंधित असलेल्या रोगजनकांच्या शोध आणि वैशिष्ट्यीकरणासाठी महत्त्वपूर्ण माहिती प्रदान करून सार्वजनिक आरोग्यासाठी योगदान देतात. त्यांच्या अष्टपैलुत्वाबद्दल धन्यवाद, सूक्ष्मजंतू अनेक प्रकारे कार्य करू शकतात: जीवन वाचवणारी औषधे तयार करणे, जैवइंधन तयार करणे, प्रदूषण साफ करणे आणि अन्न आणि पेय तयार करणे/प्रक्रिया करणे. सूक्ष्मजंतूंचा अभ्यास आपल्याला आपले जग आणि त्यातील आपले स्थान समजून घेण्यास मदत करतो. हे आपल्याला निसर्ग आणि समाजाच्या जटिलतेबद्दल अंतर्दृष्टी देते, जे यामधून विविध आरोग्य, पर्यावरणीय, सामाजिक, संस्कृती प्रदान करते. पृथ्वीवरील सूक्ष्मजीवांचा सर्वात लक्षणीय परिणाम म्हणजे सर्व सजीव प्रणाली, विशेषतः कार्बन , ऑक्सिजन आणि नायट्रोजन बनविणाऱ्या प्राथमिक घटकांचे पुनर्वापर करण्याची त्यांची क्षमता. हे घटक वेगवेगळ्या आण्विक स्वरूपात आढळतात जे सर्व प्रकारच्या जीवनांमध्ये सामायिक केले पाहिजेत. सूक्ष्मजीव ऊर्जा स्त्रोत म्हणून विविध संयुगे आणि पद्धती वापरण्यात पटाईत आहेत. खरं तर, पृथ्वीवरील बहुतेक प्रकाशसंश्लेषणासाठी सूक्ष्मजंतू जबाबदार असतात, ही प्रक्रिया वातावरणातून कार्बन काढून टाकते आणि उपउत्पादन म्हणून ऑक्सिजन निर्माण करते. सूक्ष्मजीव हवामानात महत्त्वाची भूमिका बजावतात कारण ते खातात तेव्हा



कार्बन डायऑक्साइड वातावरणात सोडतात. जीवाणू आणि त्यांचे मुख्य भक्षक, प्रोटिस्ट, पृथ्वीवरील सर्व प्राण्यांच्या बायोमासच्या ४० पट जास्त आहेत. परिणामी, त्यांचा कार्बन डायऑक्सवर प्रचंड प्रभाव पडतो. परिसंस्थेमध्ये सूक्ष्मजीवांच्या अनेक महत्त्वपूर्ण भूमिका असतात: विघटन, ऑक्सिजन उत्पादन, उत्क्रांती आणि सहजीवन संबंध. विघटन म्हणजे मृत प्राणी किंवा वनस्पती पदार्थांचे अधिक मूलभूत रेणूंमध्ये विभाजन केले जाते. ही प्रक्रिया केवळ सूक्ष्मजीवांमुळे घडते जे मृत पदार्थात प्रवेश करतात. सूक्ष्मजीवशास्त्र म्हणजे जीवाणू, विषाणू, एकपेशीय वनस्पती, बुरशी आणि प्रोटोझोआ या सूक्ष्मजीवांचा अभ्यास. सूक्ष्मजीव रोग निर्माण करण्याच्या क्षमतेसाठी सर्वात प्रसिद्ध आहेत, तथापि, कृषी, उद्योग आणि पर्यावरणासाठी सूक्ष्मजीव देखील महत्त्वपूर्ण आहेत. खरं तर, सूक्ष्मजीवांशिवाय पृथ्वीवरील जीवन जगू शकत नाही. सूक्ष्मजीव शेतीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात: सुपीकता टिकवून ठेवतात आणि मातीची गुणवत्ता सुधारतात. कंपोस्टिंग प्रक्रियेत मदत करते, जे खत तयार करते. मातीमध्ये असलेले सूक्ष्मजीव नायट्रेट्स आणि इतर पोषक तत्वांनी माती समृद्ध करतात.


**डॉ. भारती घुडे वाडेकर,**
**मायक्रोबायोलॉजी विभागाची सहाय्यक प्राध्यापक , ठाकूर श्यामनारायण पदवी महाविद्यालय, कांदिवली पूर्व, मुंबई**

मायक्रोबायोलॉजी हे एक वैद्यकीय विज्ञान आहे जिथे सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ संसर्गजन्य रोगांचे निदान करण्याशी संबंधित असतात आणि त्यासाठी वैद्यकीय मदत आणतात. उपचार आणि प्रतिबंध देखील सूक्ष्मजीवशास्त्राचा भाग आहेत. ते चांगल्या आरोग्यसेवेसाठी सूक्ष्मजंतूंच्या विविध क्लिनिकल विनवणीचा अभ्यास करतात.. मायक्रोबायोलॉजीचे मूलभूत ज्ञान तुम्हाला हे ओळखण्यास अनुमती देईल की व्यक्ती म्हणून तुमची भूमिका ट्रान्समिशनचे चक्र खंडित करण्यात, आरोग्य सेवा-संबंधित संक्रमण प्रतिबंधित करण्यात आणि प्रतिजैविक प्रतिकार () कमी करण्यात कशी मदत करू शकते.

आशा आहे की, तुम्ही सर्वजण सूक्ष्मजीवशास्त्राची संकल्पना स्पष्ट कराल. धन्यवाद.

# पॉलीटेक्नीकच्या उज्वल निकालाची एमआयटी पॉलिटेक्निकची परंपरा कायम

**ज्ञान सेतू ब्युरो**



महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने घेतलेल्या उन्हाळी - २०२६ च्या परिक्षांचा निकाल नुकताच जाहिर झाला असून या निकालामध्ये एमआयटी पॉलीटेक्नीकच्या विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान यश मिळवून महाविद्यालयाच्या उज्वल निकालाची परंपरा याही परिक्षेत कायम राखली आहे. महाविद्यालयातील सर्वच अभ्यासक्रमाचे निकाल उत्कृष्ट लागले असून इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागाचा निकाल ९७.६१% असा सर्वोत्कृष्ट असून त्याखालोखाल आर्टीफिशीयल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग विभाग (९५.४२%) , कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग (९१.३३%), इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग विभाग (८५%) सिव्हील इंजिनिअरिंग विभाग (७९.५४%) व मेकॅनिकल इंजिनिअरींग विभाग (७३.५२%) यांचा क्रमांक लागतो.

अंतिम वर्ष कॉम्प्युटर अभियांत्रीकीची विद्यार्थिनी चंचल पोटे (९४.५२%) गुण घेऊन कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागातून आणि महाविद्यालयातुन सर्वप्रथम आली आहे , या विभागात प्रेम रणमाळे (९४.१७%) आणि ऋषिकेश पाटील (९४.०५%) अनुक्रमे द्वितीय आणि तृतिय आले आहेत, इलेक्ट्रॉनिक्स आणि कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागाच्या अंतिम वर्षाचा पूजा खरात ही विद्यार्थीनी (८९.८९%) टक्के गुण घेऊन सर्वप्रथम आली आहे, शेख मिन्हा (८७.६०%) द्वितीय तर अंकिता शिंदे (८६.८०%) गुणांसहीत तृतिय आली आहे.

सिव्हील इंजिनिअरिंग विभागात प्रथम येण्याचा मान कार्तिक बखले (९१.११%) याने मिळविला असून अपूर्वा निकम(८७.२८%) व हर्षदा वाघ (८४.४४%) हे अनुक्रमे द्वितीय आणि तृतिय आले आहेत. इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग विभागामधे (८९.७२%) गुण घेऊन समर्थ भालेकर पहिला, अनुजा शिसोदे(८९.६१%) दुसरी आणि भावेश बैरागी (८८.९४%) तिसरा आला आहे. आर्टिफिशियल इंटेलीजन्स अँड मशीन लर्निंग या अभ्यासक्रमामधून ज्ञानमंजिरी साळुंके (९२.७१%) गुण घेऊन सर्वप्रथम, करुणा शर्मा (९२.५९ %) द्वितीय तर जीवन दाभाडे (९१.२९%) तृतीय आले आहेत. मेकॅनिकल इंजिनिअरींग मधून वरद कणसे ह्या विध्यार्थ्यांने (८८.०६%) गुणांसहीत प्रथम क्रमांक मिळविला असून शेख इफ्राजूद्दीन द्वितीय आणि शेख अयान तृतिय आले आहेत.

अभ्यासक्रमाच्या तिनही वर्षाच

एमआयटी पॉलिटेक्निकच्या उत्तम निकालाची परंपरा यावर्षी सुद्धा विद्यार्थ्यांनी कायम राखली आहे.

सर्व गुणवंत आणि यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष डॉ वाय ए कवडे , एमआयटीचे महासंचालक प्रा. मुनिश शर्मा, कार्यकारी अध्यक्ष प्रा भूपेश मिश्रा , संचालक प्रा. बी.एम. देशमुख, डॉ शकुंतला लोमटे , प्रा शितल देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनिल देशमुख , सर्व विभागप्रमुख आणि प्राध्यापक वृंदाने केले आहे.

हे पत्रक **संपादक ---** यांनी कार्यालय - येथून प्रकाशित केले.